**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, 3रा मजला, बेलापूर, नवी मुंबई 400614.**

**-: <u>सर्वसाधारण सभेची नोटीस</u> :-**

**दिनांक : 11/07/2019**

नवी मुंबई महानगरपालिकेची **<u>जुलै महिन्याची सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक 19 जुलै 2019 रोजी सकाळी 11.00 वाजता</u>** बेलापूर, भुखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील **<u>राजमाता जिजाऊ सभागृह</u>** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**1. इतिवृत्त.**

**2. प्रश्नोत्तरे.**

**<u>ठरावाच्या सूचना</u> :**

**3. श्रीम. संगिता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**

**"महिला व बालकल्याण समिती"** हि विशेष समिती सन 2019-2010 च्या उर्वरित कालावधीकरीता याव्दारे स्थापन करणे.

**4. डॉ.श्री. जयाजी के. नाथ, यांजकडून :-**

**"आरोग्य परिरक्षण व वैद्यकिय सहाय्य समिती"** हि विशेष समिती सन 2019-2010 च्या उर्वरित कालावधीकरीता याद्वारे स्थापन करणे.

**5. श्री. शंकर किसन मोरे, यांजकडून :-**

**"पाणीपुरवठा व मलनि:स्सारण समिती"** हि विशेष समिती सन 2019-2010 च्या उर्वरित कालावधीकरीता याद्वारे स्थापन करणे.

**6. श्री. मुनवर फकिर महमद पटेल, यांजकडून :-**

**"क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रम समिती"** हि विशेष समिती सन 2019-2010 च्या उर्वरित कालावधीकरीता याद्वारे स्थापन करणे.

**7. श्रीम. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**

**"समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार समिती"** हि विशेष समिती सन 2019-2010 च्या उर्वरित कालावधीकरीता याद्वारे स्थापन करणे.

**8. श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**

**"विधि समिती"** हि विशेष समिती सन 2019-2010 च्या उर्वरित कालावधीकरीता याद्वारे स्थापन करणे.

**9. श्रीम. पुजा गणेश मेढकर, यांजकडून :-**

**"विद्यार्थी व युवक कल्याण समिती"** हि विशेष समिती सन 2019-2010 च्या उर्वरित कालावधीकरीता याद्वारे स्थापन करणे.

**10. श्रीम. नेत्रा आशिष शिर्के, यांजकडून :-**

**"उद्यान व शहर सुशोभिकरण समिती"** हि विशेष समिती सन 2019-2010 च्या उर्वरित कालावधीकरीता याद्वारे स्थापन करणे.

**<u>आयुक्तांकडील प्रस्ताव</u> :**

11. सिडकोकडून टॅक्सी रिक्षा पार्किंग या प्रयोजनासाठी महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या भुखंडांच्या विनियोगाबाबत.

12. तुर्भे क्षेपणभुमीचा एकात्मिक विकास करणेबाबत.

13. विष्णुदास भावे नाटयगृह दर व परिचलनाबाबतची नियमावलीबाबत.

**14 व 15. श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून :-**

**(14)** सन 1992 साली ग्रामपंचायतीमधुन थेट नवी मुंबई महानगरपालिका स्थापन झाली. नवी मुंबई क्षेत्रामध्ये महानगरपालिकेस सिडको प्राधिकरणाने विकसित केलेले नोड, महाराष्ट्र औदयागिक विकास महामंडळ व पुर्वीची ग्रामपंचायतकालीन 29 गांवे मिळुन असे क्षेत्र आहे. सदर क्षेत्रामध्ये सदनिका, दुकाने, व्यापारी संकुले व औदयोगिक कामगार असुन, सध्या महानगरपालिकेकडे एकुण 3,14,000 इतक्या मालमत्ता अस्तित्वात आहेत. कमी उत्पन्न गटाच्या नागरीकांसाठी, ज्या गरीब कामगारांना मुंबई सारख्या शहरामध्ये घर घेणे परवडत नव्हते अशा कामगार वर्गासाठी तसेच माथाडी कामगार, औदयोगिक वसाहतीमध्ये/दुकानात काम करणारे कामगार यांचेसाठी सिडकोने नवी मुंबई शहरात घरे बांधली. तसेच 29 गांवामध्ये असलेले भुमिपुत्र, कामगार वर्ग कुंटुंबाची वस्ती अशा नागरीकांचे जीवनमान आज खुपच खालावले आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये 500 चौरस फुटापेक्षा कमी क्षेत्रातील सदनिकांमध्ये राहणारे कामगार, गरीब, भुमीपुत्र नागरीकांना दिलासा मिळावा म्हणुन त्यांना महानगरपालिकेमार्फत मालमत्ता करामध्ये सवलत मिळावी आणि 501 ते 700 चौरस फुटापर्यत चटईक्षेत्र असलेल्या निवासी घरांना मालमत्ता करातुन 60% सवलत देणेबाबत. **(15)** नवी मुंबई शहरातील सार्वजनिक ठिकाणी यामध्ये नवी मुंबईतील नामांकित मॉल, चित्रपटगृहे, हॉस्पीटल, शाळा, कॉलेजेस, उदयाने, रेल्वे स्थानक या ठिकाणी पार्किग करणा-या वाहनांना ज्या पध्दतीने पुणे आणि नाशिक महानगरपालिकांनी सुट दिली आहे. त्या पध्दतीने आपल्याही शहरात वाहतुक पे ॲण्ड पार्क करातुन यापुढे सुट देणे.

**16 श्रीम. शशिकला भोलानाथ पाटील, यांजकडून :-**

प्रभाग क्र. 72, तुर्भे येथील सेक्टर-24 बॅक ऑफ इंडियाच्या पाठीमागे असलेल्या जागेवर सिडको कालीन अंगणवाडी सुरु आहे. मोकळी जागा EWS कॉलनी सेक्टर-24 तुर्भे येथे असुन घर नं. ए-13, डी-8, डी-139, सी-6 च्या मध्यभागी आहेत. सदर जागा यापुर्वी अंगणवाडी म्हणुन वापरत होती. सदर ठिकाणी असलेली अंगणवाडी बंद झाल्यामुळे त्या जागेवर अतिक्रमण महानगरपालिकेने निष्काषीत केलेले आहे. तेथे पुनश्च अतिक्रमण होवु नये म्हणुन सदरची जागा सिडकोकडुन महानगरपालिकेकडे अंगणवाडी या प्रयोजनासाठी हस्तांतरीत करुन घेण्यात यावी व त्या ठिकाणी महानगरपालिकेमार्फत अंगणवाडी विकसित करणे.

**17 ते 19. श्रीम. संगीता दिलीप बोऱ्हाडे, यांजकडून :-**

**(17)** बधाई सेक्टर-3 ते ओरिएटंल कॉलेज पर्यतचा दुतर्फा रस्ता सुधारणा व टॅक्सी स्टॅण्ड सेक्टर-3 ते पेट्रोल पंप सेक्टर-3 पर्यत दुतर्फा पदपथ सुधारणा करणे. **(18)** सेक्टर-8 नवभारत प्रेस ते सुयोग समुह सेक्टर-8 येथील दुतर्फा पदपथ नव्याने बनविणे. **(19)** सेक्टर-4 येथील वृंदावन सोसायटी ते समता व ओमसृष्टी सोसायटीपर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे.

**20 ते 22. श्रीम. मनिषा शशिकांत भोईर, यांजकडून :-**
**(20)** पावणे गांव येथील महानगरपालिकेच्या बालवाडी वर्गासाठी वर्गखोल्या बांधणे. **(21)** पावणे गांव येथील महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील मुलांसाठी बेंच (बाके) तसेच शिक्षकांसाठी टेबल, खुर्ची, कपाट उपलब्ध करुन देणे. **(22)** प्रभाग क्र. 48 येथील पावणे गांव/ श्रमिक नगर येथील प्राथमिक व माध्यमिक शाळेत कायमस्वरुपी शिक्षक वर्ग तुकडयानुसार व माध्यमिक शाळेत विषयानुसार शिक्षक उपलब्ध करुन देणे.

**23 ते 25. श्री. गणेश गंगाराम म्हात्रे, यांजकडून :-**
**(23)** नवी मुंबईतील गावठाण भागात असलेल्या दुकानात व्यवसाय करताना अग्निशमन विभागाच्या ना हरकत दाखल्यासाठी घरपटटी, असेसमेंट उतारा, पाणीबिल, विदयुतबिल ग्राहय धरुन सी.सी. ओ.सी. ची सक्ती न करता त्यांना ना हरकत दाखला देणे. **(24)** नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात मागील तीन वर्षापासुन 11 महिन्याच्या कालावधीकरीता नेमणुका दिलेले वैदयकिय अधिकारी/तज्ञ तसेच महानगरपालिकेच्या सेवेत विविध विभागामध्ये 6-6 महिने करारावर विविध पदांवर अनेक कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांचा आढावा घेवुन त्यांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेत सामावुन घेणे. **(25)** सेक्टर-46ए मधील नवी मुंबई महानगरपालिकेच्या खेळाच्या मैदानात मैदानाच्या भोवती 10 फुट रुंदीचे वॉकवे तयार करणे, तसेच पावसाळयात पाण्याचा निचरा होण्यासाठी चारी बाजुस नाला बांधणे व मध्य भागी हॉलीबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉल सारख्या इनडोअर गेम खेळण्यासाठी व्यवस्था करुन सार्वजनिक कार्यक्रमासाठी मैदान भाडयाने देणे बंद करणे.

**26. श्री. विनोद विनायक म्हात्रे, यांजकडून :-**
नवी मुंबई महानगरपालिका आर्थिकदृष्टया सक्षम अशी महापालिका असुन महापालिकेच्या अनेक ठेवी महापालिकेने बॅकेमध्ये ठेवलेल्या आहेत. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खर्च देखील इतर महापालिकांपेक्षा कमी आहे. त्यामुळे विकास कामांना अधिक निधी उपलब्ध होतो. या अनुषंगाने शहरातील तसेच गांवठाणामधील व झोपडपटटी भागातील मध्यमवर्गीय नागरीकांना दिलासा म्हणुन 500 चौ.फुट कारपेट क्षेत्र असलेल्या मालमत्तांना मालमत्ता कर माफ करणे.

**27 ते 29. श्री. काशिनाथ वामन पवार, यांजकडून :-**
**(27)** प्रभाग क्र. 97 मधील सेक्टर-18 येथील साईप्रेरणा सोसायटी बिल्डींग नं. ए-4 समोरील रस्त्यावर पावसाळी पाणी तुंबुन राहत असुन त्याचा योग्य प्रकारे निचरा होत नाही याची दखल घेवुन योग्य ती उपाययोजना करणे. **(28)** प्रभाग क्र. 97 मधील पावसाळा पुर्व पावसाळी पाणी वाहुन नेणारी गटारे साफ करताना त्यावरची झाकणे योग्यरित्या बसविण्यात आली नसुन त्याचा येथील जेष्ठ नागरीकांना/सामान्य नागरीकांना त्रास होत असुन त्या झाकणांमुळे एखादी दुर्देवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी तातडीने याची दखल घेवुन योग्य ती उपाययोजना करणे. **(29)** प्रभाग क्र. 97 मधील गतिरोधक ठिकाणी जुने पट्टे अस्पष्ठ झाल्यामुळे तेथे नव्याने काळे पांढरे रंगाचे पट्टे मारणे.

**30 ते 32. श्रीम. निलम निवृत्ती जगताप, यांजकडून :-**
**(30)** प्रभाग क्र. 29, घणसोली 2 मधील उर्वरित भागात आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक असल्यामुळे मल:निस्सारण वाहिनी टाकणे. **(31)** प्रभाग क्र. 29, घणसोली 2 मध्ये पाण्याची समस्या वारंवार निर्माण होत असल्यामुळे आवश्यक असलेल्या भागात पाईप लाईन टाकणे. **(32)** प्रभाग क्र. 29, घणसोली 2 मध्ये पावसामध्ये गटारांच्या ब-याच समस्या निर्माण होतात. वारंवार लोकांच्या तक्रारी असतात. रस्त्यावर पाणी जमा झाल्यास पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे चालत जाताना नागरीकांना त्रास होतो. ही समस्या लक्षात घेवुन नवीन पदपथ व गटारे बांधणे.

**33 ते 35. श्रीम. रुपाली किस्मत भगत, यांजकडून :-**
**(33)** प्रभाग क्र. 96, नेरुळ सेक्टर-16ए कोळीवाडा येथे मल:निस्सारण वाहिनी, जलवाहिनी, स्ट्रीट लाईटची व्यवस्था करणे. **(34)** प्रभाग क्र. 96, नेरुळ, छत्रपती संभाजी राजे उदयानात आकर्षक शिल्प बसविणे. **(35)** प्रभाग क्र. 96, मधील सेक्टर-16ए, नेरुळ येथील इच्छापुर्ती श्री गणेश मंदीर येथे मिनी हायमास्ट बसविणे.

**36 ते 38. श्रीम. मिरा संजय पाटील, यांजकडून :-**
**(36)** प्रभाग क्र. 90, नेरुळ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील एसआयईएस कॉलेज कॉर्नर पासून श्री शनिश्वरा मंदिर महाव्दाराजवळील कॉर्नर पर्यंतच्या पदपथावर जागोजागी खड्डे पडलेले असून, पदपथाची दुरावस्था झाली आहे. सदर ठिकाण नेरुळनगराचा दर्शनिय भाग आहे. तरी सदर पदपथ नव्याने बनविणे. **(37)** प्रभाग क्र. 90, नेरुळ मधील श्री शनिश्वरा मंदिर महाव्दाराजवळील एसआयईएस कॉलेज कॉर्नर पासून रिलायन्स फ्रेश पर्यंत दोन दोन पावसाळी गटार वाहिन्या आहेत. यामधील रस्त्यावर असलेल्या पावसाळी गटारावर नेहमी वाहने पार्किग होत असून झाकणे सुध्दा वारंवार तुटली जातात. तसेच या ठिकाणच्या पदपथाची देखील दुरावस्था झाली आहे. तरी या ठिकाणी असलेल्या दोन दोन गटारामधुन रस्त्यावर असलेले पावसाळी गटार रद्द करुन पदपथाखालील नवीन गटारालाईन व पदपथ बनविणे. **(38)** प्रभाग क्र. 90, नेरुळ, सेक्टर 11 मधील आदिवासी पाडयासमोर व्यायामशाळा आहे. सदर ठिकाणी स्थानिक जनतेला सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टिने बहुउद्देशिय इमारत बांधणे.

**39 व 40. श्री. जयाजी के. नाथ, यांजकडून :-**
**(39)** नवी मुंबई महानगरपालिकेचे मोरबे धरण व त्या परिसरातील असणा-या जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या आहेत. भविष्यात सदर जागेवर अतिक्रमण होऊ नये म्हणुन मोरबे धरण परिसरात असणा-या जागेचे सिमांकन करुन कायमस्वरुपी कंपाउंड (तारेचे कंपाउंड) टाकण्यात यावे व जागोजागी मालकी हक्काचे बोर्ड लावणे. **(40)** माझ्या प्रभागामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातुन काही महिन्यापुर्वीच "वारकरी भवन" आणि "जेष्ठ नागरीक विरंगुळा केंद्र" अशा लोकोपयोगी आणि धार्मिक वास्तु जनकल्याणाकरीता

उभारल्या असुन, त्या ठिकाणी विविध कार्यक्रमाच्या माध्यमातुन विविध प्रकारच्या जाती धर्माचे आणि अनोळखी नागरीक सुध्दा येत असतात. त्यामुळे त्या ठिकाणी काही अनुचित प्रकार घडु नये अशा प्रकारची खबरदारी आपण घेणे अनिवार्य आहे. उभारलेल्या वास्तुंची देखभाल होणे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे. वर नमुद केलेल्या दोन्ही वास्तुचे संरक्षण होणेच्या अनुषंगाने नमुंमपाच्या माध्यमातुन लवकरात लवकर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे.

**41 व 42. श्रीम. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**

**(41)** सानपाडा विभागात अभ्यासिकेची सोय नसल्यामुळे विदयार्थी वर्गाची फारच गैरसोय होत आहे. तरी सानपाडा विभागात अभ्यासिका केंद्र उभारणे. **(42)** नवी मुंबई हे विदयेचे माहेरघर म्हणुन नावलौकीक मिळवत असताना माझे नवी मुंबईकर युपीएससी एमपीएससी अभ्यासक्रमापासुन वंचित असल्यामुळेच नवी मुंबईतुन सनदी अधिकारी तयार होत नाहीत. सानपाडा विभागात मोठया प्रमाणात सुशिक्षित वर्ग राहत आहे. त्यांना ही मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता आहे. श्री दत्त विदयामंदीर नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. 18 या इमारतीत ठाण्याच्या चिंतामणराव देशमुख या युपीएससी सेंटरच्या धर्तीवरील एक युपीएससी मार्गदर्शन सेंटर उभारणे.

**43 ते 45. श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-**

**(43)** सानपाडा विभागात सदयस्थितीत अपुरा पाणीपुरवठा होत आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातील पाणी पामबिच मार्ग बेलापुर, नेरुळ, वाशी, कोपरखैरणे विभागास उपलब्ध होत असताना एमआयडीसी व ठाणे बेलापुर महामार्गालगत असलेल्या वसाहतींना बेलापुर एमबीआर वर अवलंबुन राहवे लागत आहे. तरी ज्या पध्दतीने पामबीच मार्गे मोरबे पाईप लाईन व्दारे वसाहतीना पाणीपुरवठा केला जात आहे त्याच पध्दतीने ठाणे बेलापुर मार्गे ही नवीन पिण्याची पाण्याची पाईपलाईन टाकणे. **(44)** सानपाडा विभागात निसर्गप्रेमी संस्थेच्या वतीने मोठया प्रमाणात वृक्ष लागवड करुन त्यांचे संगोपन केले जात आहे. तसेच घरातील निर्माल्यापासुन खत निर्मिती करुन स्वच्छतेची जनजागृती मोठया प्रमाणात केली जात आहे. त्या संस्थेचा यथोचित सन्मान नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात यावा तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. सुनिल नाईक यांना नवी मुंबई रत्न पुरस्काराने सन्मानित करणे. **(45)** श्री गजानन महाराज चौक ते जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यतच्या रस्त्यावर लघुशंकेची सोय नसल्यामुळे पादचाऱ्यांची विशेषत: महिला वर्गाची फारच गैरसोय होत आहे. तरी सदर रस्त्यालगत तसेच सांडपाण्याच्या मुख्य नाल्यालगत ई टॉयलेट अथवा सी टॉयलेटची उभारणी करणे.

**46 ते 48. श्री. संजु अधार वाडे, यांजकडून :-**

**(46)** प्रभाग क्र. 12, सेक्टर-02, ऐरोली येथील ज्ञानदीप शाळेसमोरील डांबरी रस्त्याचे रुंदीकरण करणे तसेच रस्त्यालगत कंपाऊंड वॉल बांधुन देणे. **(47)** प्रभाग क्र. 12, सेक्टर-02, ऐरोली येथील एल.आय.जी. ग्रुपमधील मल:निस्सारण वाहिन्या सिडको कालीन असुन सदयस्थिती पाहता मल:निस्सारण वाहिन्या ना दुरुस्त अवस्थेत आहेत. तेथील नागरीकांच्या घरात मल:निस्सारण सांडपाणी जमा होत आहे. तरी प्रभाग क्र. 12 सेक्टर-02, ऐरोली येथे नव्याने मल:निस्सारण वाहिन्या टाकणे. **(48)** प्रभाग क्र. 12 सेक्टर-02, ऐराली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयानात भव्य आकाराचे शिल्प तयार करुन देणे.

**49 ते 51. श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**

**(49)** प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर, दिघा येथील विभागात उर्वरित ठिकाणी रस्ते (पदपथ) बांधणे. **(50)** प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर, दिघा येथील विभागात उर्वरित ठिकाणी जलवाहिनी टाकुन बोअरवेल मारणे. **(51)** प्रभाग क्र. 1, ईश्वरनगर, दिघा येथील 1) आनंदनगर बॉबीचाळी जवळ असलेले सार्वजनिक शौचालय 2) ईश्वरनगर येथील मुख्य रस्त्यालगत असलेले सार्वजनिक शौचालय 3) बालीनगर येथील दुमजली सार्वजनिक शौचालयांची दुरावस्था झाली असुन आतील टाईल्स, दरवाजे तुटलेले असुन त्यांची दुरुस्ती करणे.

**52 ते 54. श्री. सुनील बाळाराम पाटील, यांजकडून :-**

**(52)** प्रभाग क्र. 92, सेक्टर-21, नेरुळ येथील अंतर्गत गटारे व पदपथ हे सिडको कालावधीतील असल्याने नादुरुस्त झालेली आहेत. त्यामुळे पावसाळयात पाण्याचा निचरा बरोबर होत नाही. तसेच पदपथ नादुरुस्त असल्याने नागरीकांना फार त्रास होत आहे. म्हणुन सदर भागातील गटारे व पदपथांची नव्याने बांधणी करणे. **(53)** प्रभाग क्र. 92, नेरुळ येथे जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र नसल्याने जेष्ठ नागरीकांची फार गैरसोय होत आहे. म्हणुन प्रभाग क्र. 92 येथे विरंगुळा केंद्र बांधणे. **(54)** राज्य शासनाने मुंबईतील 500 चौ.फुट घरांना प्रॉपर्टी टॅक्स मध्ये सुट देण्याचा निर्णय घेतला आहे. नवी मुंबई हे शहर प्रकल्पग्रस्तांच्या त्यागाने उभे राहिले आहे. नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची संपुर्ण जमीन शासनाने नवी मुंबई शहर उभारणीसाठी संपादीत केली आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त भुमिहिन झाला आहे. नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांची घरे ही 500 चौ.फुटापेक्षा जास्त आहेत. त्यामुळे 500 चौ.फुट घरांना प्रॉपर्टी टॅक्स मध्ये सुट देण्याचा निर्णयामुळे नवी मुंबईतील एकाही प्रकल्पग्रस्ताला त्याचा फायदा होणार नाही. म्हणुन नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या घरांना जो प्रॉपर्टी टॅक्स आकारला जातो त्या प्रॉपर्टी टॅक्समध्ये 50% सुट मिळावी असा प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेने शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे.

**55 ते 57. श्रीम. दयावती संपत शेवाळे, यांजकडून :-**

**(55)** प्रभाग क्र. 63, सेक्टर-17, वाशी येथील नवरत्न हॉटेल ते टेम्पो स्टॅण्ड युनियन ऑफिस पर्यत तसेच टॅक्सी युनियन ऑफिस ते वाशी प्लाझा पर्यत या परिसरात खुप मोठया प्रमाणात पार्किगची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे तेथे बहुमजली पार्किग इमारत उभारणे. **(56)** प्रभाग क्र. 63, सेक्टर-17, वाशी च्या पुर्वेकडील बाजुस असलेला पामबीच लगतच्या नाल्यातील दुर्गधीमुळे माझ्या प्रभागातील नागरीकांना खुप मोठया प्रमाणात दुर्गधीचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे सदरचा नाला बंदीस्त करावा व त्याच्यावर पार्किग

सुशोभिकरण करणे. **(57)** नवी मुंबई शहर हे विकसित शहर असुन शहरामध्ये सर्व जाती धर्माचे नागरीक कोणतेही मतभेद न बाळगता गुण्यागोविंदाने राहतात. जगाच्या इतिहासातील महामानवांमध्ये तथागत भगवान गौतम बुध्द हे सर्व श्रेष्ठ मानले जात असुन सर्वच खंडात भगवान गौतम बुध्दांचे अनुयायी आहेत. नवी मुंबईचे आकर्षक असलेल्या नेरुळ येथील ज्वेल ऑफ नवी मुंबई येथे शांततेचे प्रतिक असलेल्या भगवान गौतम बुध्दांचा पुतळा उभारल्यास सदर पर्यटन स्थळाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होईल. तरी आपण सदर ठरावानुसार ज्वेल ऑफ नवी मुंबई सेक्टर-28 येथील तलावात शांततेचे प्रतिक असलेल्या गौतम बुध्द यांचा भव्य दिव्य असा पुतळा उभारणे.

**58 व 59. श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**

**(58)** प्रभाग क्र. 51, मधील बंद पडलेली पाण्याची टाकी तोडून तेथे नागरिकांच्या सोईसाठी उद्यान किंवा विरंगुळा केंद्र बनविणे. **(59)** प्रभाग क्र. 51, मधील स्मशानासमोरील नाला बुजविलेल्या बिन रहदारीच्या रस्त्यावर स्थानिकांचा दैनंदिन बाजार उपलब्ध करुन देणे.

**60 ते 62. श्रीम. सायली नारायण शिंदे, यांजकडून :-**

**(60)** कोपरखैरणे - महापे उड्डाण पुलाचे डागडुजीकरण व सुशोभिकरण करणे. **(61)** कोपरखैरणे ते घणसोलीकडे जाणारा FOB (कोपरखैरणे -महापे उड्डाणपूल कोपरखैरणे येथे जिथे उतरतो तेथे) लवकरात लवकर करणे. **(62)** प्लॉट नं. 1 ते प्लॉट नं. 8 ते प्लॉट नं. 64 ते 68 येथे हेव्ही डयुटी गटर करणे.

**63. श्री. गिरीश कान्हा म्हात्रे, यांजकडून :-**

प्रभाग क्र. 95, नेरुळ, मधील अंतर्गत मुख्य रस्त्यांचे थीन व्हाईट टॉपींग पध्दतीने कॉंक्रिटीकरण करणे.

**64 ते 66. श्री. घन:शाम रतन मढवी, यांजकडून :-**

**(64)** घणसोली सेक्टर-8 स्मशानभुमी येथे मुख्य प्रवेशव्दार, अत्याधुनिक शौचालय, बैठक व्यवस्था, भजन मंडळीसाठी जागा, गार्डन, विदयुत व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्टोरेज टँक इ. नियोजन बध्द सुविधा पुरविणे. **(65)** घणसोली गावासाठी सामाजिक सुविधेसाठी सिडकोकडुन भुखंड उपलब्ध करुन घेणे. जसे की, खेळाचे मैदान, उदयान, समाजमंदीर, हॉस्पीटल, नाना-नानी पार्क, जेष्ठ नागरीक भवन, स्वातंत्र्य सैनिक स्मृती भवन, विरंगुळा केंद्र, महिला सक्षमीकरण केंद्र , वारकरी भवन, आगरी कोळी भवन, मंडई (भाजीपाला, मासळी मार्केट) इत्यादीकरीता भुखंड आरक्षित करुन पुढील अंमलबजावणी करणे.

**(66)** घणसोली गांव परिसरात पिण्याच्या पाण्याची समस्या मोठया प्रमाणात भेडसावत असल्याने सेक्टर-8, राजीव गांधी कॉलेजजवळ जी सिडको निर्मित पाण्याची टाकी आहे ती कार्यान्वीत करुन किंवा त्या ठिकाणी GSR, ESR पाण्याच्या नवीन टाक्या बांधुन सदर पाणी समस्या कायमस्वरुपी सोडविणे.

**67 व 68. श्री. मनोज गोपीनाथ हळदणकर, यांजकडून :-**

**(67)** शिवाजी प्लोअर मिलच्या समोरील उडडाण पुलापासुन भारत बिजली अंडरपास पर्यत व ऐरोली भुयारी मार्गापासुन ते चिंचपाडा सिग्लपर्यत सर्व्हिस रोड विकसित करणे. **(68)** ऐरोली रेल्वे स्टेशनजवळील भुयारी मार्गालगत सिडको प्रशासनाच्या मालकीच्या जागेचे हस्तांतरीत करुन त्यावर कोकण भवन येथे विकसित केलेल्या खाऊ गल्लीच्या धर्तीवर या ठिकाणी खाऊ गल्ली विकसित करणे.

**69 ते 71. श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-**

**(69)** प्रभाग क्र. 27 अंतर्गत अर्जुनवाडी येथील रस्त्याची डांबरीकरण करुन सुधारणा करणे. **(70)** प्रभाग क्र. 27 अंतर्गत तळवली नाका येथे मच्छीमार्केट ते उच्चस्तरीय जलकुंभ पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करुन सुधारणा करणे. **(71)** प्रभाग क्र. 27 अंतर्गत अर्जुनवाडी येथील महालक्ष्मी अपार्टमेंट ते वारणा सोसायटी पर्यत गटाराची दुरुस्ती करुन सुधारणा करणे.

**72 ते 74. श्रीम. मोनिका लक्ष्मीकांत पाटील, यांजकडून :-**

**(72)** प्रभाग क्र. 28 अंतर्गत असलेल्या सामाजिक सुविधेसाठी आरक्षित असलेल्या भुखंडावर जलकुंभ उभारणे. **(73)** प्रभाग क्र. 28 मध्ये शैक्षणिक गरज लक्षात घेता अदयावत असे वाचनालय (Library) उभारणे. **(74)** प्रभाग क्र. 28 मध्ये दैनदिन मार्केट उभारणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक 11 जुलै 2019.**